पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १७

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०६/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०८/०६/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. गोफणे अनुराधा देविदास
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर

या शिवाय मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.मोरे – कार्यालय अधिक्षक (सभाशाखा), मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.शैलजा शितोळे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

मा.महिला व बालकल्याण समितीची दि.०८/०६/२०१६ ची पाक्षिक सभा दि.२२/०६/२०१६ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**सभापती –** दिनांक २२/०६/२०१६ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १७

**सभावृत्तांत**

**(** दि.०८/०६/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **२२/०६/२०१६** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची दिनांक ०८/०६/२०१६ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **२२/०६/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. गोफणे अनुराधा देविदास
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. नेटके सुमन राजेंद्र
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. लांडे श्रध्दा बाजीराव
७) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
८) मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.आष्टीकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **२५/०५/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १६ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १८      विषय क्रमांक : १

दिनांक : २२/०६/२०१६      विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक : मा.श्रध्दा लांडे,      अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/८/कावि/२७/२०१६, दि.२०/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत " LMV –TRची पक्की अनुज्ञप्ती प्राप्त महिलांना किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅच प्राप्त महिलांना अर्थसहाय्य देणे " या योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी र.रु.२०००/- इतकी रक्कम ही पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील सोबत जोडलेल्या महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) ची पुर्तता करणा-या अर्जानुसारच्या पात्र महिलांना देणेकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणे व आवश्यकतेनुसार सदर योजनेत बदल दुरुस्ती करण्याचा व त्यानुसार पुढील कार्यवाही करुन लाभ देण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३५/२०१६
दिनांक : २३/०६/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्रमांक नावियो/८/कावि/२७/२०१६ दि.२०/०५/२०१६ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे १८
नागरवस्ती विकास योजना विभाग
महिला व बालकल्याण योजना

" LMV –TRची पक्की अनुज्ञप्ती प्राप्त महिलांना किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅच प्राप्त महिलांना अर्थसहाय्य देणे "

**महिला व लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष ( अटी व शर्ती )**

१. महिला/मुलीच्या नावे आधार कार्ड/आधारकार्ड काढलेबाबतची पोहोच पावती (रहिवाशी प्रत) ची स्वाक्षांकित सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
२. पिं.चिं.म.न.पा.हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.
३. वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे/नाव असलेले :– आधारकार्ड/ आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत)/घरपट्टी (मिळकतकर) पावती/ पिं.चिं.म.न.पा.चे झोपडपट्टीधारक म्हणून ओळखपत्र/मतदार ओळखपत्र/विद्युत बील/टेलिफोन बील/राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक/रेशनकार्ड इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (स्वाक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ अर्जासोबत सादर करावे लागेल.
४. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक, पुराव्यार्थ मा.तहसिलदार/ तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला/पिवळे/केशरी रेशनकार्डवरील र.रु.१,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न आवश्यक. त्यानुसार अर्जासोबत मा.तहसिलदार / तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला/ पिवळे/ केशरी रेशनकार्ड (स्वाक्षांकित सत्यप्रत) जोडणे आवश्यक.
५. लग्नानंतरच्या किंवा इतर कारणास्तव नाव बदलाबाबतचा पुराव्यार्थ पॅनकार्ड / लग्नपत्रिका/विवाह नोंदणी दाखला/प्रमाणपत्र/शासकीय राजपत्र, र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर केलेले नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (स्वाक्षांकित सत्यप्रत) अर्जासोबत जोडणे आवश्यक.
६. दि.०१/०४/२०१५ रोजीची किंवा त्यापुढील कालावधीत प्राप्त LMV –TR च्या पक्या अनुज्ञप्तीची किंवा 3W-TR (ऑटोरिक्षा ट्रान्स्पोर्ट (**Transport**) ची पक्की अनुज्ञप्ती व बॅचची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
७. सदरचा लाभ एकदाच देणेत येईल.
८. लाभ देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त सो./मा.आयुक्त सो. यांना राहिल.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८